सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११ वे, राजपत्र क्र. ३३] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर/डिसेंबर २७-३, २०२५ : अग्रहायण ६-१२, शके १९४७ [किंमत : ०.०० रुपये

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ-छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याव्यतिरिक्त केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले व महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना)

**टीप :**–प्रत्येक अधिसूचनेच्या आधी मधोमध जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.

**१**

**आयुक्त महानगरपालिका, यांजकडून**

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

**दिनांक २०/११/२०२५**

**जा.क्र.मनपा/सा.प्र./आस्था-१/२०२५/१९२६** .– राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, दि.२८ एप्रिल २०१५ लागू करण्यात आलेला आहे. सदरहू अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने त्या पुरवीत असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. यामध्ये महानगरपालिका या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थांमार्फत देण्यात येणा-या विविध सेवा-सुविधांपैकी नागरिक केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणा-या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत. अशा सेवा अध्यादेशाच्या कलम ३ नुसार विविध शासन निर्णयाव्दारे अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत.

शासन निर्णय क्र.आरटीएस-०५२५/प्र.क्र.६८/न.वि.३२ दिनांक २७ जुन २०२५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ खालील नमुद सेवांची विहित करण्यात आलेली कालमर्यादा कमी करण्यात आलेली आहे.

त्यानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ३ अन्वये लोकसेवेची सूची नियत कालमर्यादा खालीलप्रमाणे जाहीर करीत आहे.

शासन निर्णय क्र.आरटीएस-०५२५/प्र.क्र.६८/न.वि.३२ दिनांक २७ जुन २०२५

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५

| अ.क्र. | अधिसूचित सेवेचे नाव | सेवेची विहित कालमर्यादा | सेवेची प्रस्तावित सुधारीत कालमर्यादा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे<br>ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १५ दिवस | १२ दिवस |
| २ | नळजोडणी देणे | १५ दिवस | ७ दिवस |
| ३ | जलनिःस्सारण जोडणी देणे | १५ दिवस | १२ दिवस |
| ४ | अग्निशमन अंतिम नाहरकत दाखला देणे (महानगरपालिकेकरीता) | १५ दिवस | १२ दिवस |
| ५ | पुनः कर आकारणी | १५ दिवस | १२ दिवस |
| ६ | रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सूट मिळणे | १५ दिवस | १२ दिवस |
| ७ | स्वयंमुल्यांकन | १५ दिवस | १२ दिवस |
| ८ | तात्पुरते/कायमस्वरुपी नळजोडणी खंडीत करणे | १५ दिवस | १२ दिवस |
| ९ | पुनः जोडणी करणे | १५ दिवस | १२ दिवस |
| १० | प्लंबर परवाना नुतणीकरण करणे | १५ दिवस | १२ दिवस |
| ११ | परवान्याचे नुतनीकरण | १५ दिवस | १२ दिवस |
| १२ | परवाना हस्तांतरण | १५ दिवस | १२ दिवस |
| १३ | परवाना दुय्यम प्रत | १५ दिवस | ७ दिवस |
| १४ | परवाना रद्द करणे | १५ दिवस | १२ दिवस |

| अ.क्र. | अधिसूचित सेवेचे नाव | सेवेची विहित कालमर्यादा | सेवेची प्रस्तावित सुधारीत कालमर्यादा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १५ | कालबाह्य परवानासाठी नुतनीकरण सुचना | १५ दिवस | १२ दिवस |
| १६ | व्यवसाय परवाना स्वयं-नुतनीकरण | १५ दिवस | १० दिवस |
| १७ | रस्ता खोदाई परवाना देणे | ३० दिवस | १२ दिवस |
| १८ | राज्य खाद्य परवान्याकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा नाहरकत दाखला | ३० दिवस | १२ दिवस |
| १९ | खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा आरोग्यविषयक नाहरकत दाखला | ३० दिवस | १२ दिवस |
| २० | पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे | ३० दिवस | ७ दिवस |
| २१ | महाराष्ट्र शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत शुश्रृषा-गृह परवान्याचे नुतनीकरण करणे. (महानगरपालिकेकरीता) | ३० दिवस | १५ दिवस |
| २२ | महाराष्ट्र शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत परवान्यावर परवानाधारक /भागीदाराचे नाव बदलणे. (महानगरपालिकेकरीता) | ३० दिवस | १५ दिवस |
| २३ | लॉजिंग हाउस परवान्याचे नुतनीकरण करणे. | ३० दिवस | १५ दिवस |
| २४ | मंगल कार्यालय / सभागृह वगैरे परवान्याचे नुतनीकरण करणे. | ३० दिवस | १५ दिवस |
| २५ | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे | १५ दिवस | ७ दिवस |

**( जी. श्रीकांत )**
आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.